ICE 'n' SPICE
व्हेज रेस्टॉरन्ट
पंजाबी डिशेस् । पावभाजी । चाईनीज । न्युसेस् । आईस्क्रीम
गोदावरी कॉम्प्लेक्स,व्ही.आय.पी.रोड,नांदेड
मो. 9422172572, 9850430189

सायं दैनिक
नांदेड वार्ता
www.nandedwarta.com

• वर्ष २५ वे • अंक ४० • मंगळवार दि.३ नोव्हेंबर २०२६ • नांदेड • पोस्ट परवाना/एनएनडी/आरएनपी-२६२/२०२६-२०२८ • पाने ४ • किंमत १ रु.

भाजप नेत्यांना उच्च न्यायालयाचे खडेबोल

दिया मिर्झाचा व्हिडीओ पुन्हा प्रसारित करण्याचे आदेश



मुंबई/प्रतिनिधी-दिवाळीत फटाके न फोडण्याचे आवाहन करणाऱ्या अभिनेत्री दिया मिर्झाच्या व्हिडीओवरून निर्माण झालेल्या वादात मुंबई उच्च न्यायालयाने भाजप नेत्यांना खडेबोल सुनावत हा व्हिडीओ पुन्हा प्रसारीत करण्याचे महत्त्वपूर्ण निर्देश दिले आहेत. भारत हा धर्मनिरपेक्ष देश आहे, असे स्पष्ट करत न्यायालयाने राजकीय नेत्यांच्या वक्तव्यांवर नाराजी व्यक्त केली.

मुंबई महापालिकेने वायू आणि ध्वनी प्रदूषणाविरोधात जनजागृती मोहीम हाती घेतली असून, यासाठी दिया मिर्झा आणि क्रिकेटपटू अजिंक्य रहाणे यांची मदत घेण्यात आली होती. या मोहिमेअंतर्गत दिया मिर्झाने दिवाळीत फटाक्यांमुळे होणारे प्रदूषण टाळण्याचे आवाहन केले होते. मात्र, भाजप नेते अमित साटम यांनी या उपक्रमावर आक्षेप घेत दिवाळी कशी साजरी करावी, हे सांगण्यासाठी दिया मिर्झाची गरज नसल्याची टीका केली. त्यानंतर महापालिकेने तिचा व्हिडीओ समाज माध्यमांवरून हटविला. या प्रकरणाची सुनावणी करताना न्यायमूर्ती गिरीश कुलकर्णी आणि न्यायमूर्ती डॉ. नीला गोखले यांच्या खंडपीठाने राजकीय नेत्यांच्या वक्तव्यांबाबत नाराजी व्यक्त केली. सार्वजनिक रस्त्यांवर फटाके फोडू नयेत, या न्यायालयाच्या निर्देशांची जनजागृती करण्यासाठी महापालिकेने अभिनेत्रीची मदत घेतली होती. त्यामुळे अशा मोहिमेवरून निर्माण झालेल्या राजकीय वादाची न्यायालयाने दखल घेतली.हटवलेला व्हिडीओ पुन्हा अपलोड करण्याचे निर्देश देत न्यायालयाने महापालिकेची भूमिका बदलण्यास सांगितले. दिया मिर्झाने आपल्या संदेशातून फटाक्यांमुळे होणारे वायू आणि ध्वनी प्रदूषण आरोग्यासाठी घातक असल्याचे सांगितले होते. दिवाळी आवाजांनी नाही, तर आनंदाने साजरी करा, असे आवाहनही तिने केले होते. या प्रकरणामुळे पर्यावरण विषयक जनजागृती आणि राजकीय हस्तक्षेपाचा मुद्दा पुन्हा चर्चेत आला आहे.

दिवाळीच्या तोंडावर राज्यात पावसाचे संकट!

नांदेड,लातूरमध्ये येलो अलर्ट;पुढील तीन दिवस पावसाची शक्यता

मुंबई/प्रतिनिधी- भारतीय हवामान विभागाने राज्यातील विविध जिल्ह्यांना पावसाचा इशारा दिला असून, पुढील दोन ते तीन दिवस अनेक भागांत पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे. दिवाळीचा सण जवळ आलेला असताना पावसाचा अंदाज व्यक्त झाल्याने शेतकरी आणि नागरिकांची चिंता वाढली आहे.

राज्यातील हवामानात अचानक बदल झाला असून, एकीकडे सकाळच्या सुमारास थंडीची चाहूल जाणवत असतानाच दुसरीकडे अवकाळी पावसाचे संकट निर्माण झाले आहे. हवामान विभागाच्या अंदाजानुसार, मुंबई, ठाणे आणि रायगड जिल्ह्यांत पावसाची शक्यता आहे. रत्नागिरी जिल्ह्यात मेघगर्जनेसह पाऊस होण्याचा अंदाज असून, सिंधुदुर्ग जिल्ह्याला पावसाचा येलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. या काळात ताशी ३० ते ४० किलोमीटर वेगाने वारे वाहण्याची शक्यता असल्याने नागरिकांनी सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. उत्तर महाराष्ट्रातील नाशिक आणि नंदुरबार जिल्ह्यांत तुलनेने कोरडे हवामान राहण्याचा अंदाज आहे. मात्र, राज्याच्या अन्य भागांत पावसाची शक्यता कायम आहे. यंदा राज्यातील अनेक भागांत अपेक्षित पाऊस झाला नसल्याने खरीप हंगामातील पिकांवर परिणाम झाला आहे. अशा परिस्थितीत आता ऐन दिवाळीच्या तोंडावर पावसाचा अंदाज व्यक्त झाल्याने शेतकऱ्यांसमोर नवे संकट उभे राहण्याची शक्यता आहे. पश्चिम महाराष्ट्रातही पावसाचे सावट निर्माण झाले आहे. कोल्हापूर जिल्ह्यात पावसाचा इशारा देण्यात आला असून, सोलापूर जिल्ह्यात हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे. काही पान ४ वर

खा.शरद पवार यांना बुधवारी रुग्णालयातून डिस्चार्ज



पुणे:राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांना छातीत सौम्य वेदना जाणवल्याने पुण्यातील रुबी हॉल क्लिनिकमध्ये काल दाखल करण्यात आले होते. सध्या त्यांची प्रकृती स्थिर असून, त्रास कमी झाल्याने ४ नोव्हेंबर रोजी त्यांना रुग्णालयातून डिस्चार्ज मिळण्याची शक्यता आहे. रुग्णालय प्रशासनाने याबाबत माहिती दिली.

शरद पवार हे राज्यातील दुष्काळग्रस्त भागांच्या तीन दिवसीय दौऱ्यावर असताना दौऱ्याच्या दुसऱ्या दिवशी धाराशिव येथे त्यांना अस्वस्थ वाटू लागले. त्यामुळे त्यांनी दौरा स्थगित करून पुण्याकडे प्रयाण केले. त्यानंतर त्यांना रुबी हॉल क्लिनिकमध्ये दाखल करण्यात आले. रुग्णालयाचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय विश्वस्त डॉ. पुरवेझ के. ग्रँट यांनी अधिकृत निवेदनाद्वारे त्यांच्या प्रकृतीची माहिती दिली. डॉक्टरांचे पथक त्यांच्यावर उपचार करत असून, वैद्यकीय देखरेख सुरू आहे. त्यांना जाणवणारा त्रास कमी झाला असून प्रकृती चांगली असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. दरम्यान, ४ नोव्हेंबर रोजी त्यांना घरी सोडण्याची शक्यता असली, तरी डिस्चार्जचा अंतिम निर्णय वैद्यकीय तपासणीनंतर घेतला जाणार आहे.

डंकीन भागातील जुगार अड्ड्यावर पोलीसांची धाड;अकरा जणांना अटक



नांदेड/प्रतिनिधी-डंकीन भागातील लिंगायत समाजाच्या स्मशानभूमीजवळ सुरु असलेल्या जुगार अड्ड्यावर सोमवारी मध्यरात्री वजिराबाद पोलीसांनी धाड टाकुन अकरा जणांना अटक केली आहे. त्यांच्या जवळून ३ लाख ५८ हजार रुपयांचा ऐवज पोलीसांनी जप्त केला.

लिंगायत समाजाच्या स्मशानभूमी जवळ अनेक दिवसांपासून जुगार अड्डा सुरु होता. जुगार अड्ड्याची माहिती मिळाल्यानंतर पोलीस अधीक्षक डॉ.नीलाभ रोहन, पोलीस उपअधीक्षक रामेश्वर वैंजने यांच्या मार्गदर्शनाखाली वजिराबाद पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक अजित कुंभार, फौजदार खंडू दर्शने व पोलीस कर्मचाऱ्यांनी सोमवारी मध्यरात्री जुगार अड्ड्यावर छापा टाकला. पैसे लावून तिर्रट नावाचा जुगार खेळत असतांना पोलीसांनी नदीम शेख अब्दुल्ला रा.बरकतपूरा, सय्यद जुबेर स.नवाब अली रा.खडकपूरा, बिरुसिंग कार्तासिंग रागी रा.शहीदपूरा, गेट नं.५, इरआनबेग समदानीबेग रा.तेहरानगर, मो.जमीर अब्दुल रज्जाक रा. गोवर्धनघाट टेकडी, मो.शाकीर मो.ताजीओद्दीन रा.नवीन हस्सापूर, शमशोद्दीन अमीरोद्दीन शेख रा.मिलगेट, स.मोहसीन स.कासीम रा.दुल्हेशा रहेमाननगर, अब्दुल रज्जाक अ.सत्तार रा.दुल्हेशाह रहेमाननगर, हरप्रीतसिंघ कुलवंतसिंघ चहल रा.गुरुद्वारा गेट नं.४, भगतसिंघ गुरुदयालसिंघ ढिल्लो रा.गुरुद्वारा गेट नं.४, नांदेड यांना अटक केली आहे. सय्यद नासीर रा.खडकपूरा, स.फरहान रा.खडकपूरा, यासीम शेख रा.दुल्हेशाह रहेमाननगर, युसुअखान युनुसखान रा.दुल्हेशाह रहेमाननगर, नांदेड हे चार जण जुगार अड्डा चालवत असल्याचे पान २ वर

नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्याच्या कोठडीतील आरोपीच्या आत्महत्येची चौकशी सीआयडीकडे वर्ग

नांदेड/प्रतिनिधी-नांदेड ग्रामीण पोलीस स्टेशनच्या लॉकअपमध्ये एका आरोपीने गळफास घेवून आत्महत्या केल्याची घटना सोमवारी घडली होती. या घटनेचा तपास आता राज्य गुन्हा अन्वेषण विभाग (सीआयडी) कडे वर्ग करण्यात आला आहे.

धनेगाव येथील विटभट्टी परिसरात काम करणाऱ्या सुशील महाजन हैबते (वय ३८) रा.टाकळी धनेगाव ता.मुखेड याने सोमवारी पहाटे पत्नी छाया सुशील हैबते हिचा गळा आवळून खून केला होता. पत्नीने गळफास घेवून आत्महत्या केल्याचा बनाव करण्याचा प्रयत्न आरोपी सुशील हैबते यांना केला होता. मयत महिलेच्या बहिणीने सदरील घटना आत्महत्या नसून खून केला असल्याचे पोलीसांना सांगितले. तेव्हा नांदेड ग्रामीण पोलीसाच्या पथकाने सुशील हैबते यास ताब्यात घेतले. पोलीस तपासात त्याने पत्नीचा गळा आवळून खून केल्याची कबुली दिली. पोलीसांनी त्यास नांदेड ग्रामीण पोलीस स्टेशनच्या जुन्या इमारतीमध्ये ठेवले होते. सोमवारी सायंकाळी ४ च्या सुमारास सुशील हैबते याने शौचालयात जावून खिडकीच्या अँगलला वायरच्या साह्याने गळफास घेवून आत्महत्या केली. इमारतीत असलेल्या दुसऱ्या आरोपीने पोलीसांना घटनेची माहिती दिली. आरोपीने आत्महत्या केल्याचे समजताच पोलीसांना धक्काच बसला. पोलीसांनी घटनास्थळावरुन सुशील हैबते याचे प्रेत खाली उतरवुन शवविच्छेदनासाठी शासकीय रुग्णालयात पाठविले. याप्रकरणी नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यात विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्याचा तपास राज्य गुन्हा अन्वेषण विभागाकडे वर्ग करण्यात आला आहे. राज्य गुन्हा अन्वेषण विभागाचे पोलीस अधीक्षक यशवंत काळे यांनी मंगळवारी नांदेड ग्रामीण पोलीस स्टेशनला भेट देवून घटनास्थळाची पाहणी केली. या गुन्ह्याचा पुढील तपास आता राज्य गुन्हा अन्वेषण विभागाच्या पोलीस उपअधीक्षक सुगावे मॅडम ह्या करीत आहेत.

मौजे कासारखेड शिवारात गुप्त धनासाठी खड्डा खोदणाऱ्या दहा जणांना अटक

नांदेड/प्रतिनिधी-मौजे कासारखेड शिवारात रविवारी रात्री बारा वाजण्याच्या सुमारास शेतामध्ये गुप्त धन काढण्यासाठी खड्डा खोदत असतांना दहा जणांना अर्धापूर पोलीसांनी अटक केली आहे.

मौजे कासारखेड शिवारातील एका शेतामध्ये गुप्त धन काढण्यासाठी खड्डा खोदत असल्याची गुप्त माहिती अर्धापूर पोलीसांना मिळाली. पोलीस निरिक्षक अमोल भगत यांच्या मार्गदर्शनाखाली फौजदार सुरेश भोसले व पोलीस कर्मचाऱ्यांनी रविवारी रात्री १२ वाजण्याच्या सुमारास सदर ठिकाणी छापा टाकला. गुप्त धनासाठी खड्डा खोदत असतांना शेख मतीन अन्सार शेख (वय २७) रा.कासारखेडा, स.रहिम स.गफुर (वय ४२) रा.पूर्णा, संतोष रघुनाथसिंग ठाकूर (वय ४२) रा.पूर्णा, मौलवी रऊफखान भोजमखान पठाण (वय ४९) रा.पूर्णा, निज मुजाहिदीन बेग (वय ३०) रा.छत्रपती संभाजीनगर, तुझीबखान जाफरखान पठाण (वय ३९) रा.पूर्णा, शेख जावेद रशीद शेख (वय ३८), शेख रिजवान शेख अजीम (वय ३०), शेख यासीम शेख पाशा (मौलवी), अफरोज जावेद फारुखी सर्व रा.छत्रपती संभाजीनगर हे आयतन कुर्शी पठण करुन पाणी दम फुकून गुप्त धन काढण्यासाठी खड्डा खोदत असतांना पोलीसांना आढळून आले. शेख अन्सार शेख सत्तार, सुफियाना अन्सर शेख रा.कासारखेडा व हासिम पठाण रा.परभणी हे तीघेजण फरार झाले आहेत. याप्रकरणी अर्धापूर पोलीस ठाण्यात तेरा जणांविरुध्द जादुटोणा अधिनियम व विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

जगदंबा तांड्यात रस्त्याअभावी महिलेचा मृत्यू, तर मांडवीत प्रसूतीनंतर माता मृत्यू

विकासाच्या घोषणा नेमक्या कुणासाठी?

सरफराज दोसानी

माहूर:स्वातंत्र्याची ७३ वर्षे उलटली, विकासाचे असंख्य दावे झाले, कोट्यवधींच्या योजनांची घोषणा झाली; मात्र माहूर-किनवट तालुक्यातील दुर्गम भागातील आदिवासी जनतेच्या नशिबी आजही हालअपेष्टा आणि मृत्यूशी संघर्ष कायम आहे. कुठे रस्ता नसल्याने रुग्णाला वेळेत दवाखान्यात नेता येत नाही, तर कुठे शासकीय रुग्णालयात पुरेशा आरोग्य सुविधा नसल्याने महिलेचा जीव जातो. गेल्या आठवड्यातील जगदंबा तांडा आणि मांडवी येथील दोन घटनांनी विकासाच्या दाव्यांचा बुरखा पुन्हा फाडला आहे.

किनवट तालुक्यातील अंबाडी ग्रामपंचायतीच्या हद्दीतील जगदंबा तांड्यावर १९९२ मध्ये वस्ती निर्माण झाली. आज ३५ घरे आणि जवळपास शंभर लोकसंख्या असलेल्या या तांड्याला ३४ वर्षांनंतरही पक्का रस्ता मिळालेला नाही. जंगलातून जाणारी खडतर घाटवाट हाच दळणवळणाचा एकमेव आधार आहे. अशाच परिस्थितीत ६० वर्षीय धुरपतबाई मंगू चव्हाण यांची प्रकृती खालावली. उपचारासाठी घेऊन जाताना रस्त्याअभावी मोटारसायकलचा प्रवास अर्ध्या घाटातच थांबला. २९ ऑक्टोबर रोजी सकाळी ९.४५ वाजता दवाखान्यात पोहोचण्यापूर्वीच त्यांची प्राणज्योत मालवली. मृतदेहही ट्रॅक्टरमधून खडतर वाटेने तांड्यावर आणावा लागला. यापूर्वीही अशा घटना घडल्या असून, चार वर्षांपूर्वी एका तरुणाचा मृतदेह झोळीतून खांद्यावर आणावा लागला होता. तरीही प्रशासनाला जाग आलेली नाही.





दुसरीकडे, मांडवी येथील कै. बळीराम पाटील शासकीय ग्रामीण रुग्णालयात सोनू उर्फ पायल प्रवीण पेंदोर या आदिवासी महिलेचा प्रसूतीनंतर मृत्यू झाल्याने आरोग्य व्यवस्थेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. २८ ऑक्टोबर रोजी नव्या जीवाचे आगमन झाले; मात्र त्याचवेळी त्या बालकाच्या डोक्यावरील आईचे छत्र हरपले. प्रसूतीनंतर अतिरक्तस्राव झाल्याची माहिती समोर येत असताना, वेळेत उपचार मिळाले का, आवश्यक वैद्यकीय सुविधा उपलब्ध होत्या का आणि अन्य रुग्णालयात हलविण्याचा निर्णय वेळेत घेतला का, असे प्रश्न उपस्थित होत आहेत. मांडवीपासून आदिलाबाद येथील रिम्स रुग्णालय अवघ्या ३५ किलोमीटरवर असताना पायलला यवतमाळ येथे रेफर करण्यात आले. या प्रवासादरम्यान तिचा मृत्यू झाला. मांडवी परिसरातील नागरिकांसाठी आदिलाबादचे रिम्स रुग्णालय अनेकदा जीवनदायी ठरले आहे. मात्र, महाराष्ट्रातील रुग्णांना दाखल करून घेण्यास टाळाटाळ होत असल्याच्या तक्रारीही आहेत. सीमावर्ती भागातील रुग्णांना जवळच्या रुग्णालयात उपचार मिळण्यात अडचणी येत असतील, तर राज्य सरकार आणि जिल्हा प्रशासनाने कायमस्वरूपी तोडगा काढणे आवश्यक आहे.

मांडवीसारख्या आदिवासीबहुल भागातील ग्रामीण रुग्णालयात स्त्रीरोगतज्ज्ञ, भूलतज्ज्ञ, बालरोगतज्ज्ञ, प्रशिक्षित कर्मचारी आणि आवश्यक औषधांची उपलब्धता असणे गरजेचे आहे. मात्र, अपुऱ्या सुविधांमुळे रुग्णांना अन्यत्र रेफर पान ४ वर

मांडवीतील माता मृत्यूने आ.केराम व्यथित! दोषींवर कठोर कारवाईची मागणी

मांडवी येथील कै. बळीराम पाटील शासकीय ग्रामीण रुग्णालयात प्रसूतीनंतर अतिरक्तस्रावामुळे सोनी उर्फ पायल प्रवीण पेंदोर (वय २२) यांचा मृत्यू झाल्याने आमदार भीमराव केराम यांनी तीव्र दुःख व्यक्त केले आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी त्यांनी जिल्हा शल्यचिकित्सक, नांदेड यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे. संबंधित वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांची भूमिका, उपचारांतील विलंब आणि संभाव्य वैद्यकीय निष्काळजीपणाची निष्पक्ष चौकशी करावी. तसेच मांडवी ग्रामीण रुग्णालयात स्त्रीरोगतज्ज्ञ, भूलतज्ज्ञ, आवश्यक औषधे, उपकरणे व आपत्कालीन सुविधा तातडीने उपलब्ध कराव्यात, अशी मागणी आ. केराम यांनी केली आहे. भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी आदिवासी भागातील आरोग्य व्यवस्था सक्षम करण्याची गरजही त्यांनी व्यक्त केली.

दिवाळीत राजकीय फटाके?

देशाच्या राजकीय पटलावर सध्या घडणाऱ्या वेगवान घडामोडींनी राजकारणाचे वातावरण चांगलेच तापवले आहे. दिवाळीच्या सणात फटाक्यांची आतषबाजी होणारच; मात्र यंदा राजकीय फटाक्यांचा आवाज अधिक मोठा असण्याची चिन्हे दिसत आहेत. केंद्र सरकारला नीट पेपरफुटी प्रकरणावरून अडचणीत आणल्यानंतर विरोधकांना नवे बळ मिळाले आहे. त्यात निवडणूक आयोगाच्या कारभारावरून निर्माण झालेला वाद आणि महाराष्ट्रातील राष्ट्रवादी काँग्रेसच्या राजकारणात सुरू असलेल्या हालचाली यामुळे राजकीय समीकरणे बदलण्याची शक्यता निर्माण झाली आहे.नीट पेपरफुटी प्रकरणाने देशभरातील लाखो विद्यार्थ्यांच्या भवितव्याचा प्रश्न ऐरणीवर आणला. या प्रकरणात केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांना राजीनामा द्यावा लागल्यानंतर विरोधकांच्या हातात सरकारविरोधी प्रभावी मुद्दा आला. यापूर्वीही विरोधकांनी अनेक प्रश्नांवर केंद्र आणि राज्य सरकारला घेरण्याचा प्रयत्न केला होता; परंतु त्यांना अपेक्षित यश मिळत नव्हते. आता मात्र विद्यार्थ्यांच्या भविष्याशी संबंधित प्रश्नावरून सरकारची कोंडी झाल्याने विरोधकांना राजकीयदृष्ट्या शंभर हत्तींचे बळ मिळाल्याचे चित्र आहे.नीट प्रकरणाचा वाद सुरू असतानाच निवडणूक प्रक्रियेच्या पारदर्शकतेवरूनही केंद्र सरकार आणि निवडणूक आयोगाला प्रश्न विचारले जात आहेत. महाराष्ट्रातील २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत बोगस मतदारांचा समावेश झाल्याचा आरोप राहुल गांधी यांनी केला होता. पश्चिम बंगालमध्ये एसआयआर प्रक्रियेमुळे हजारो मतदार मतदानाच्या हक्कापासून वंचित राहिल्याचा आरोप झाला. गोव्यातही मतदार याद्यांबाबत असेच प्रश्न उपस्थित झाले. मतदार यादी ही लोकशाहीचा पाया असताना त्यातील त्रुटी आणि कथित गैरप्रकारांकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. न्यायालयाच्या निर्देशांनंतरही निवडणूक आयोगाच्या भूमिकेबाबत समाधानकारक उत्तर मिळत नसल्याची विरोधकांची तक्रार आहे.दरम्यान, केंद्रीय निवडणूक आयोगाच्या कामकाजासंदर्भातील काही गंभीर बाबी इंग्रजी दैनिक 'इंडियन एक्स्प्रेस'ने समोर आणल्या. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या कार्यपद्धतीबाबत अन्य दोन निवडणूक आयुक्तांनी केलेला पत्रव्यवहार प्रसिद्ध झाल्यानंतर या वादाला आंतरराष्ट्रीय स्तरावरही प्रसिद्धी मिळाली. निवडणूक आयोगासारख्या घटनात्मक संस्थेच्या स्वायत्ततेचा प्रश्न यामुळे पुन्हा ऐरणीवर आला आहे. निवडणूक आयोग हा सत्ताधाऱ्यांच्या सोयीचा नव्हे, तर लोकशाहीच्या विश्वासार्हतेचा रक्षक असला पाहिजे. त्यामुळे आयोगाच्या कारभारावर प्रश्न उपस्थित करणाऱ्या विरोधकांना केवळ राजकीय हेतूने प्रेरित ठरवून मोकळे होता येणार नाही. ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी विरोधकांनी एकजूट दाखवण्यास सुरुवात केली आहे.एकीकडे राष्ट्रीय पातळीवर सत्ताधाऱ्यांना विरोधकांच्या प्रश्नांचा सामना करावा लागत असताना महाराष्ट्रात मात्र वेगळ्याच राजकीय घडामोडींना वेग आला आहे. राष्ट्रवादी काँग्रेसच्या अजित पवार गटातील नेत्यांच्या भाजपच्या वरिष्ठ नेत्यांसोबत होणाऱ्या भेटींनी राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आले आहे. उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार आणि खासदार पार्थ पवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची भेट घेतल्यानंतर या चर्चेला सुरुवात झाली. त्यानंतर दिलीप वळसे पाटील, प्रफुल्ल पटेल, सुनील तटकरे, छगन भुजबळ आणि धनंजय मुंडे यांच्यासारख्या प्रमुख नेत्यांनीही स्वतंत्रपणे केंद्रीय गृहमंत्र्यांची भेट घेतल्याने या भेटी केवळ सदिच्छा भेटी होत्या की त्यामागे काही राजकीय गणिते आहेत, असा प्रश्न उपस्थित होत आहे.यातच अजित पवार गटाच्या आमदारांची देवगिरी बंगल्यावर होणारी महत्त्वपूर्ण बैठक चर्चेचा केंद्रबिंदू ठरली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही गटांचे विलीनीकरण होणार का? प्रफुल्ल पटेल आणि सुनील तटकरे यांच्यासह काही नेते भाजपच्या वाटेवर आहेत का? की राज्य मंत्रिमंडळाच्या संभाव्य विस्ताराच्या पार्श्वभूमीवर मंत्रिपदांचे गणित जुळवण्यासाठी या भेटीगाठी सुरू आहेत? असे अनेक प्रश्न राजकीय चर्चेतून पुढे येत आहेत. अर्थात, या चर्चांना अद्याप अधिकृत दुजोरा मिळालेला नाही. मात्र राजकारणात धूर निघत असेल तर त्यामागे काहीतरी हालचाल सुरू असण्याची शक्यता नाकारता येत नाही. महाराष्ट्रातील राष्ट्रवादी काँग्रेसचे राजकारण हे केवळ एका पक्षाच्या भवितव्यापुरते मर्यादित नाही. त्याचा परिणाम महायुतीच्या अंतर्गत सत्तासंतुलनावर, मंत्रिमंडळातील वाटपावर आणि आगामी निवडणुकांच्या राजकीय समीकरणांवर होऊ शकतो. त्यामुळे या भेटीगाठींकडे केवळ नेत्यांच्या वैयक्तिक राजकीय संबंधांच्या दृष्टिकोनातून पाहणे योग्य ठरणार नाही.दिवाळी हा अंधारातून प्रकाशाकडे जाण्याचा सण आहे. मात्र देशाच्या राजकारणात सध्या कोणाच्या हातात प्रकाशाची पणती आहे आणि कोणाच्या हातात सत्तेचे फटाके, हे समजणे कठीण झाले आहे. विरोधकांना मिळालेल्या नव्या संधीचा ते कितपत उपयोग करून घेतात आणि सत्ताधारी या आव्हानांना कसे सामोरे जातात, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. महाराष्ट्रात राष्ट्रवादीच्या राजकीय भूमिकेचा नेमका फैसला काय होतो, याकडेही सर्वांचे लक्ष लागले आहे. दिवाळीच्या या राजकीय आतषबाजीत कोणाचे राजकीय बार उडणार आणि कोणाची दिवाळी अंधारात जाणार, याचे उत्तर येणारा काळच देईल. मात्र या सगळ्या सत्तासंघर्षात लोकशाही, विद्यार्थ्यांचे भविष्य आणि मतदारांचा विश्वास यांचा बळी जाऊ नये, एवढीच अपेक्षा!

दुष्काळः नैसर्गिक व सामाजिक आव्हान

दुष्काळ ही केवळ पावसाच्या अभावामुळे निर्माण होणारी नैसर्गिक आपत्ती नसून मानवी जीवन, सामाजिक व्यवस्था, ग्रामीण अर्थव्यवस्था आणि पर्यावरण यांची कसोटी पाहणारे गंभीर आव्हान आहे. महाराष्ट्राच्या संदर्भात दुष्काळाचा विचार करताना या समस्येचे स्वरूप अधिक व्यापक असल्याचे लक्षात येते. राज्यातील शेतीचा मोठा भाग पावसावर अवलंबून आहे. त्यामुळे पावसाचे प्रमाण कमी झाले किंवा त्याचे वितरण अनियमित झाले, तर शेतकऱ्यांच्या उत्पन्नापासून ग्रामीण कुटुंबांच्या दैनंदिन जीवनापर्यंत अनेक बाबींवर परिणाम होतो. पिण्याच्या पाण्याची टंचाई, पिकांचे नुकसान, जनावरांसाठी चाऱ्याचा अभाव, शेतमजुरांना काम न मिळणे, कर्जाचा वाढता भार आणि रोजगारासाठी होणारे स्थलांतर या दुष्काळाच्या प्रमुख सामाजिक परिणामांपैकी काही आहेत. पाणी हे जीवनाचे मूलभूत साधन असल्यामुळे त्याच्या उपलब्धतेतील घट संपूर्ण समाजाच्या जगण्यावर परिणाम करते. निसर्गातील पावसाचे चक्र मानवी नियंत्रणात नसले, तरी पाण्याचे नियोजन, जलस्रोतांचे संवर्धन, शेतीतील बदल आणि सामाजिक सुरक्षेच्या उपाययोजनांच्या माध्यमातून दुष्काळाची तीव्रता कमी करता येते. म्हणूनच महाराष्ट्रातील दुष्काळाकडे केवळ नैसर्गिक संकट म्हणून न पाहता ते एक महत्त्वाचे सामाजिक, आर्थिक आणि विकासविषयक आव्हान म्हणून पाहणे आवश्यक आहे.

महाराष्ट्राची भौगोलिक रचना, पर्जन्यमानातील प्रादेशिक तफावत आणि शेतीचे स्वरूप यांमुळे राज्यातील विविध भागांना वेगवेगळ्या प्रकारच्या जलसंकटांचा सामना करावा लागतो. सह्याद्रीच्या पश्चिमेकडील कोकणात आणि घाटमाथ्यावरील काही भागांत तुलनेने अधिक पाऊस पडतो; परंतु सह्याद्रीच्या पूर्वेकडील पर्जन्यछायेच्या प्रदेशात पावसाचे प्रमाण कमी असते. मराठवाड्यातील अनेक भाग, पश्चिम महाराष्ट्रातील काही तालुके आणि विदर्भातील काही प्रदेश पावसाच्या अनिश्चिततेमुळे प्रभावित होतात. नाशिक जिल्ह्यातही पश्चिमेकडील डोंगराळ भाग आणि तुलनेने कमी पाऊस पडणारे पूर्वेकडील भाग यांच्यात पर्जन्यमानाची तफावत आढळते. त्यामुळे एकाच जिल्ह्यातील वेगवेगळ्या तालुक्यांना पाणीटंचाईचे वेगवेगळे स्वरूप अनुभवावे लागू शकते. पावसाचे वार्षिक प्रमाण हा दुष्काळ समजून घेण्याचा एकमेव निकष नाही. पाऊस कोणत्या काळात पडतो, त्यामध्ये किती खंड पडतात, जमिनीतील ओलावा किती काळ टिकतो आणि भूजलसाठ्यांचे पुनर्भरण कितपत होते, या बाबीही तितक्याच महत्त्वाच्या आहेत. म्हणून महाराष्ट्रातील दुष्काळाचे नियोजन करताना संपूर्ण राज्यासाठी एकच उपाययोजना लागू करण्याऐवजी प्रत्येक प्रदेशाच्या भौगोलिक आणि सामाजिक परिस्थितीनुसार उपाययोजना आखणे आवश्यक आहे.

महाराष्ट्राने वेगवेगळ्या काळांत पावसाच्या अनिश्चिततेमुळे निर्माण झालेल्या गंभीर संकटांचा सामना केला आहे. विशेषतः चा दुष्काळ महाराष्ट्राच्या सामाजिक आणि आर्थिक इतिहासातील एक महत्त्वाचा संदर्भ मानला जातो. त्या काळात ग्रामीण भागातील मोठ्या लोकसंख्येला अन्नधान्य, पाणी आणि रोजगाराच्या प्रश्नांना सामोरे जावे लागले. शेतीचे नुकसान झाल्याने शेतकरी आणि शेतमजुरांच्या उपजीविकेवर परिणाम झाला. रोजगार हमीच्या कामांद्वारे ग्रामीण भागातील गरजू लोकांना काम उपलब्ध करून देण्याची संकल्पना पुढे येण्यात त्या काळातील अनुभवांचा महत्त्वाचा वाटा होता. त्या काळाच्या तुलनेत आज सिंचनाच्या सुविधा, रस्ते, दळणवळण, हवामानविषयक माहिती आणि कृषितंत्रज्ञान यांत बदल झाले आहेत. तरीही दुष्काळाचे आव्हान संपलेले नाही. आजही पावसातील दीर्घ खंड, भूजलाचा अतिवापर, पाण्याचे असमान वितरण आणि शेतीच्या वाढत्या खर्चामुळे अनेक कुटुंबे संकटात सापडू शकतात. पूर्वीच्या दुष्काळात पाण्यासाठी लांब अंतर चालत जाणे, बैलगाड्यांद्वारे पाणी वाहून आणणे आणि मोठ्या प्रमाणावर रोजगाराच्या शोधात स्थलांतर करणे अशा समस्या दिसून येत होत्या. आज पाणीपुरवठ्याची साधने वाढली असली, तरी टँकरवरील अवलंबित्व, खोलवर गेलेल्या विहिरी, वाढलेला वीजखर्च आणि पाण्याच्या वापरातील विषमता या स्वरूपांत संकट कायम दिसू शकते. त्यामुळे भूतकाळातील अनुभवांचा अभ्यास करून वर्तमानातील दुष्काळ व्यवस्थापन अधिक सक्षम करणे आवश्यक आहे.

महाराष्ट्राच्या कृषी अर्थव्यवस्थेवर दुष्काळाचा सर्वाधिक परिणाम होतो. राज्यातील मराठवाडा आणि पावसावर अवलंबून असलेल्या इतर भागांत ज्वारी, बाजरी, तूर, हरभरा, कापूस आणि सोयाबीन यांसारखी पिके घेतली जातात. पावसाचा खंड पडल्यास पेरणी उशिरा होते, दुबार पेरणीची वेळ येते किंवा उभ्या पिकांचे नुकसान होते. बियाणे, खते, कीटकनाशके आणि मशागतीसाठी केलेला खर्च वाया जाण्याची शक्यता निर्माण होते. शेतकऱ्यांना पुढील हंगामासाठी भांडवल उभे करणे आणि कर्जाची परतफेड करणे कठीण होते. अल्पभूधारक शेतकऱ्यांकडे आर्थिक राखीव साधने कमी असल्याने त्यांना या संकटाचा अधिक फटका बसतो. दुष्काळामुळे शेतीचे उत्पादन घटल्यास शेतमालाची आवक आणि बाजारपेठेतील व्यवहारही प्रभावित होऊ शकतात. मात्र, बाजारभावातील बदलांवर मागणी, साठवणूक, वाहतूक आणि व्यापारधोरणे यांचाही परिणाम होत असल्याने उत्पादन घटले म्हणजे प्रत्येक पिकाचा भाव त्याच प्रमाणात वाढेल असे नाही. या परिस्थितीत शेतकऱ्यांना हवामानविषयक माहिती, पीकविमा, वेळेवर नुकसानभरपाई, सुलभ कर्जव्यवस्था आणि पर्यायी रोजगार उपलब्ध करून देणे महत्त्वाचे आहे. महाराष्ट्रातील ऊसशेती आणि पाण्याच्या वापराचा प्रश्न दुष्काळाच्या चर्चेत विशेष महत्त्वाचा ठरतो. राज्यातील अनेक भागांत ऊस हा साखर उद्योग आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेचा महत्त्वाचा आधार आहे. साखर कारखान्यांमुळे रोजगार, वाहतूक, शेतीपूरक व्यवसाय आणि स्थानिक आर्थिक व्यवहारांना चालना मिळते. मात्र, ऊस हे तुलनेने अधिक पाणी लागणारे पीक असल्यामुळे पाणीटंचाईग्रस्त भागांत त्याच्या लागवडीचे नियोजन अत्यंत काळजीपूर्वक करणे आवश्यक आहे. ज्या प्रदेशांत पाण्याची उपलब्धता मर्यादित आहे, तेथे भूजलसाठे आणि इतर जलस्रोत लक्षात न घेता पाण्याची मोठी गरज असलेल्या पिकांचा विस्तार केल्यास पाणीवापरावरील ताण वाढू शकतो. याचा अर्थ ऊसशेतीला सरसकट विरोध करणे असा नसून पीकपद्धती, पाण्याची उपलब्धता आणि स्थानिक पर्यावरण यांचा समतोल राखणे असा आहे. ठिबक सिंचन, पाण्याचे मोजून नियोजन, पीक फेरपालट आणि कमी पाण्यात येणाऱ्या पर्यायी पिकांचा विचार यांमुळे परिस्थितीनुसार पाण्याचा कार्यक्षम वापर करता येऊ शकतो. शेतीविषयक निर्णय घेताना शेतकऱ्यांना केवळ पीक बदलण्याचा सल्ला देऊन चालणार नाही; त्यांना बाजारपेठ, प्रक्रिया उद्योग, तांत्रिक मार्गदर्शन आणि आर्थिक मदत यांचा आधारही मिळणे आवश्यक आहे.



दुष्काळाचा परिणाम महाराष्ट्रातील शेतमजुरांच्या जीवनावरही गंभीर स्वरूपात दिसून येतो. शेतीतील पेरणी, निंदणी, कापणी आणि इतर कामे कमी झाल्यामुळे मजुरीच्या संधी घटतात. ग्रामीण भागातील अनेक कुटुंबे रोजंदारीवर अवलंबून असल्यामुळे काम न मिळाल्यास अन्नधान्य, औषधे, घरखर्च आणि मुलांचे शिक्षण यांसाठी आवश्यक पैसा उपलब्ध होत नाही. विशेषतः भूमिहीन कुटुंबांकडे शेतीतून मिळणारे पर्यायी उत्पन्न नसल्याने त्यांची आर्थिक असुरक्षितता वाढते. काही कुटुंबे पुणे, मुंबई, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, नागपूर आणि इतर औद्योगिक किंवा बांधकाम क्षेत्रांकडे रोजगारासाठी स्थलांतर करतात. स्थलांतरामुळे तात्पुरते उत्पन्न मिळू शकते; परंतु त्यातून असुरक्षित कामाच्या परिस्थिती, अपुऱ्या निवासव्यवस्था, आरोग्यसेवेचा अभाव आणि मुलांच्या शिक्षणात खंड पडण्यासारख्या समस्या उद्भवू शकतात. ऊसतोडणीसाठी हंगामी स्थलांतर करणाऱ्या कुटुंबांनाही मुलांचे शिक्षण, आरोग्य आणि निवास यांचे प्रश्न भेडसावू शकतात. त्यामुळे दुष्काळनिवारणाचा विचार करताना शेतीला मदत देण्याबरोबरच शेतमजुरांसाठी स्थानिक रोजगार, रोजगार हमीची प्रभावी अंमलबजावणी आणि स्थलांतरित कुटुंबांसाठी सामाजिक संरक्षण यांनाही प्राधान्य द्यावे लागते.

डॉ.राजेंद्र बगाटे

दुष्काळ ही सामाजिक विषमता वाढविणारी परिस्थितीही ठरू शकते. आर्थिकदृष्ट्या सक्षम शेतकऱ्यांना विहिरी, सिंचनाची साधने, पाण्याची साठवणूक किंवा पर्यायी व्यवसाय यांचा आधार मिळू शकतो; परंतु लहान शेतकरी आणि भूमिहीन कुटुंबांकडे असे पर्याय मर्यादित असतात. पाणीटंचाई निर्माण झाल्यास गावातील सर्व वस्त्यांना समान प्रमाणात पाणी मिळतेच असे नाही. मुख्य वस्तीच्या तुलनेत दूरवर असलेल्या वस्त्यांपर्यंत पाणी पोहोचण्यास अडचणी येऊ शकतात. सामाजिकदृष्ट्या वंचित कुटुंबांना पाण्याच्या स्रोतांपर्यंत पोहोचताना अधिक अडथळे येण्याची शक्यता असते. त्यामुळे पाण्याचे वितरण केवळ उपलब्धतेवर आधारित न ठेवता सामाजिक न्यायाच्या तत्त्वावर आधारित असणे आवश्यक आहे. प्रत्येक गावातील सर्व वस्त्या, गरीब कुटुंबे आणि वंचित घटक यांना सुरक्षित पाणी मिळेल याची खात्री करणे हे स्थानिक प्रशासनाचे महत्त्वाचे कर्तव्य आहे. दुष्काळाच्या काळात पाणी, अन्न आणि रोजगार या मूलभूत गरजांबाबत पारदर्शकता राखल्यास सामाजिक संघर्ष कमी करता येऊ शकतात. दुष्काळाचा महिलांच्या जीवनावर विशेष परिणाम होतो. महाराष्ट्रातील अनेक ग्रामीण भागांत पिण्याचे पाणी आणण्याची जबाबदारी प्रामुख्याने महिलांवर असते. विहिरी किंवा पाण्याचे टँकर दूरवर असल्यास त्यांना पाणी मिळविण्यासाठी अधिक वेळ आणि श्रम खर्च करावे लागतात. त्यामुळे त्यांच्या आरोग्यावर परिणाम होतो आणि शिक्षण, रोजगार किंवा इतर विकासाच्या संधींसाठी उपलब्ध असलेला वेळ कमी होतो. कुटुंबाचे उत्पन्न घटल्यास घरखर्चाचे नियोजन, मुलांचे संगोपन आणि अन्नाची व्यवस्था करण्याचा अतिरिक्त भार महिलांवर पडतो. गर्भवती महिला, लहान मुले, वृद्ध आणि दिव्यांग व्यक्तींना पाणीटंचाईच्या काळात अधिक अडचणी येऊ शकतात. पाण्याची गुणवत्ता खालावल्यास जलजन्य आजारांचा धोका वाढतो. म्हणूनच पाणीपुरवठ्याच्या नियोजनात महिलांचा सहभाग, आरोग्यसेवा, पोषण आणि स्वच्छता यांना महत्त्व देणे आवश्यक आहे. पाणीवाटपाच्या समित्यांमध्ये महिलांना निर्णयप्रक्रियेत सहभागी करून घेतल्यास स्थानिक गरजांची अधिक परिणामकारक ओळख होऊ शकते.

दुष्काळाचा पशुधनावर आणि पर्यावरणावरही गंभीर परिणाम होतो. पाऊस कमी पडल्यास गवताची वाढ खुंटते, चाऱ्याचे उत्पादन घटते आणि जनावरांसाठी पाणी मिळविणे कठीण होते. चारा आणि पशुखाद्याच्या किमती वाढल्यामुळे पशुपालकांचा खर्च वाढतो. आर्थिक अडचणींमुळे काही शेतकऱ्यांना जनावरे विकावी लागतात. ग्रामीण अर्थव्यवस्थेत पशुधनाला आर्थिक आणि सामाजिक महत्त्व असल्यामुळे त्याचे नुकसान म्हणजे भविष्यातील उत्पन्नाचा आधार कमकुवत होणे होय. पर्यावरणाच्या दृष्टीने जंगलतोड, जमिनीची धूप, पाणलोट क्षेत्रांचे नुकसान आणि भूजलाचा अतिवापर यांमुळे पाणीटंचाईची तीव्रता वाढू शकते. पावसाचे पाणी जमिनीत मुरण्याऐवजी वेगाने वाहून गेल्यास भूजल पुनर्भरण कमी होते. तापमानातील वाढ आणि पावसाच्या वितरणातील अनिश्चितता यांमुळे काही प्रदेशांतील दुष्काळाचा धोका वाढू शकतो. तथापि, प्रत्येक दुष्काळाचे कारण केवळ हवामानबदल आहे असे म्हणता येत नाही. स्थानिक हवामान, जमिनीचा वापर, जलव्यवस्थापन आणि मानवी हस्तक्षेप या सर्व घटकांचा एकत्रित विचार करावा लागतो.

महाराष्ट्रात दुष्काळाचा सामना करण्यासाठी जलसंधारण, पाणलोट क्षेत्र विकास आणि भूजल पुनर्भरण यांना प्राधान्य देणे आवश्यक आहे. पावसाचे पाणी स्थानिक परिसरात अडविणे, जमिनीत मुरविणे आणि योग्य पद्धतीने साठविणे यामुळे जलसुरक्षा वाढविता येते. नालाबंधारे, मृद्बंधारे, शेततळी, समतल चर, पुनर्भरण विहिरी आणि छतावरील पावसाच्या पाण्याचे संकलन अशा उपाययोजना स्थानिक परिस्थितीनुसार उपयुक्त ठरू शकतात. महाराष्ट्रात जलयुक्त शिवारसारख्या जलसंधारण उपक्रमांमधून पाणी साठवणूक आणि जलस्रोतांच्या बळकटीकरणाला महत्त्व देण्यात आले आहे. अशा उपक्रमांचे मूल्यमापन करताना केवळ झालेली कामे किंवा खर्च यांचाच विचार न करता प्रत्यक्ष पाणी उपलब्धतेत झालेला बदल, भूजल पुनर्भरण, कामांची टिकाऊपणा आणि स्थानिक समुदायाला मिळालेला लाभ यांचाही अभ्यास करणे आवश्यक आहे. कोणतीही जलसंधारणाची रचना उभारल्यानंतर तिची देखभाल, गाळ काढणे आणि योग्य वापर यांकडे दुर्लक्ष झाल्यास अपेक्षित परिणाम मिळत नाहीत. म्हणूनच ग्रामपंचायती, शेतकरी गट आणि स्थानिक नागरिक यांच्या सहभागातून जलस्रोतांचे नियोजन व संवर्धन करणे गरजेचे आहे. दुष्काळाच्या काळात महाराष्ट्र शासन आणि स्थानिक प्रशासनाची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरते. पाणीटंचाईग्रस्त गावांची वेळेवर ओळख, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, आवश्यकतेनुसार टँकरद्वारे पाणीपुरवठा, जनावरांसाठी चारा आणि रोजगार उपलब्ध करून देणे या तातडीच्या उपाययोजना आहेत. पात्र शेतकऱ्यांना नियमानुसार पीकविमा आणि नुकसानभरपाई मिळणे, ग्रामीण कुटुंबांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होणे आणि गरजू व्यक्तींना अन्नसुरक्षेचा आधार मिळणे आवश्यक आहे. महाराष्ट्रातील रोजगार हमीविषयक योजना आणि विविध जलसंधारण कार्यक्रम ग्रामीण भागाला आधार देऊ शकतात. मात्र, योजनांचे यश त्यांच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीवर अवलंबून असते. मदत वेळेवर मिळते का, पाणी गरजू वस्त्यांपर्यंत पोहोचते का, निधीचा योग्य वापर होतो का आणि केलेल्या कामांची गुणवत्ता टिकून राहते का, या बाबींची नियमित तपासणी आवश्यक आहे. ग्रामपंचायती, पंचायत समित्या, जिल्हा प्रशासन, कृषी विभाग आणि जलसंपदा विभाग यांच्यात समन्वय असणे गरजेचे आहे. संकटाच्या काळातील मदतीबरोबरच दुष्काळपूर्व तयारी, पाण्याचे अंदाजपत्रक आणि दीर्घकालीन जलनियोजन यांनाही समान महत्त्व दिले पाहिजे. दुष्काळावर मात करण्यासाठी विज्ञान, तंत्रज्ञान आणि लोकसहभाग यांची सांगड घालणे आवश्यक आहे. हवामानाचा अंदाज, पर्जन्यमानाची नोंद, भूजलपातळीचे निरीक्षण आणि पिकांच्या स्थितीचे मूल्यमापन यांच्या मदतीने संभाव्य संकटाची पूर्वकल्पना मिळू शकते. ही माहिती शेतकऱ्यांपर्यंत वेळेवर आणि समजण्यास सोप्या भाषेत पोहोचल्यास पेरणी, पीकनिवड आणि पाण्याच्या वापराबाबत योग्य निर्णय घेता येतात. प्रत्येक गावाने उपलब्ध पाणी, संभाव्य गरजा आणि पाणीवापराचे प्राधान्यक्रम यांचा आढावा घेऊन स्थानिक जलनियोजन करावे. घरगुती वापरात पाण्याची बचत करणे, गळती रोखणे, पावसाचे पाणी साठविणे आणि जलस्रोत स्वच्छ ठेवणे या साध्या कृतीही महत्त्वाच्या आहेत. शाळा, महाविद्यालये, स्वयंसेवी संस्था आणि ग्रामपंचायती यांच्या माध्यमातून जलसाक्षरता वाढविल्यास पाण्याबद्दल सामूहिक जबाबदारीची भावना निर्माण होऊ शकते. पाण्याची जबाबदारी केवळ शासनाची किंवा शेतकऱ्यांची नसून समाजातील प्रत्येक घटकाची आहे.

महाराष्ट्रातील दुष्काळाचे आव्हान पेलण्यासाठी तात्पुरत्या मदतीबरोबरच दीर्घकालीन आणि सर्वसमावेशक धोरणाची आवश्यकता आहे. पाण्याची उपलब्धता, शेतीचे स्वरूप, ग्रामीण रोजगार, सामाजिक विषमता आणि पर्यावरणसंवर्धन यांचा एकत्रित विचार केल्याशिवाय दुष्काळावर कायमस्वरूपी मात करता येणार नाही. पावसाचे प्रमाण आपल्या नियंत्रणात नसले, तरी पावसाच्या पाण्याचे संकलन, भूजलाचा विवेकपूर्ण वापर, योग्य पीकपद्धती, स्थानिक रोजगारनिर्मिती आणि संकटग्रस्तांना वेळेवर मदत या बाबी मानवी प्रयत्नांच्या कक्षेत येतात. शेतकरी, शेतमजूर, महिला, मुले, वृद्ध आणि दिव्यांग व्यक्ती यांच्या गरजांकडे लक्ष देणे ही दुष्काळ व्यवस्थापनातील सामाजिक जबाबदारी आहे. शासन, स्थानिक स्वराज्य संस्था, संशोधन संस्था, स्वयंसेवी संघटना आणि नागरिक यांनी एकत्रितपणे प्रयत्न केल्यास दुष्काळाची तीव्रता कमी करणे शक्य आहे. पाण्याचा प्रत्येक थेंब जपणे, जमिनीची सुपीकता टिकविणे आणि नैसर्गिक संसाधनांचा न्याय्य वापर करणे ही केवळ आजची गरज नाही, तर पुढील पिढ्यांच्या सुरक्षित जीवनाची हमी आहे. महाराष्ट्राच्या दुष्काळग्रस्त भागांना जलसुरक्षित बनविण्यासाठी निसर्गाशी समतोल राखणारी विकासदृष्टी, पारदर्शक प्रशासन, वैज्ञानिक नियोजन आणि लोकसहभाग यांची सांगड घालणे आवश्यक आहे. दुष्काळाला केवळ नैसर्गिक संकट न मानता सामाजिक परिवर्तनाची आणि शाश्वत विकासाची दिशा ठरविणारे आव्हान मानले, तर जलसंपन्न, सक्षम आणि सामाजिकदृष्ट्या न्याय्य महाराष्ट्राच्या निर्मितीकडे वाटचाल करता येईल.

पान १ वरुन

डंकीन भागातील जुगार...

निष्पन्न झाले आहे. या पंधरा जणांविरुध्द वजिराबाद पोलीस ठाण्यात मुंबई जुगार कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीसांनी घटनास्थळावरुन सहा मोटरसायकली व फक्त ३ हजार ३९० रुपये असा ३ लाख ५८ हजार रुपयांचा ऐवज जप्त केला.

सायंदैनिक नांदेड वार्ता
* संपर्क कार्यालय *
व्ही.डी.देशपांडे भवन, सोमेश कम्पाऊंड, मिलगेट जवळ, नांदेड-१
मुख्यसंपादक-प्रदीप नागापूरकर,भ्रमणध्वनी ९४२२१७४७७४,
सहसंपादक-अविनाश पाटील, भ्रमणध्वनी ९४२१९९०८८८
E-mail: nandedwarta@mail.com

नांदेडमध्ये वाहतुकीची कोंडी

नांदेड/प्रतिनिधी-नांदेड शहरातील प्रमुख रस्त्यांवर वाहतुकीची कोंडी निर्माण होत आहे.

शहरातील मुख्य रस्त्यांवरील फुटपाथवर हातगाडे व फळविक्रेते यांनी व्यवसाय थाटले आहेत. तसेच रस्त्यांच्या बाजुला वाहने उभी करीत असल्याने ठिकठिकाणी वाहतुकीची कोंडी होत असून त्याचा त्रास वाहन चालकांना होत आहे. शहरातील बाजारपेठेत दिवाळीची खरेदी करण्यासाठी नागरिक गर्दी करीत आहेत. परंतु वाहन पार्किंगचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर येत असून अनेकजण दुकाना समोरच वाहने उभी करीत आहेत.

गोकुंद्यात पोलीस ठाणे स्थापन करण्याची शिष्टमंडळाची पोलीस अधीक्षकांकडे मागणी

ठाकरे चौकातील गँगवारनंतर नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण



किनवट/प्रतिनिधी-गोकुंदा परिसरात वाढत्या गुन्हेगारीच्या घटनांमुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न ऐरणीवर आला असून, येथे स्वतंत्र ग्रामीण पोलीस ठाणे सुरू करण्याची मागणी जोर धरू लागली आहे. या मागणीसह किनवट पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक जगदीश मंडलवार यांच्या बदलीची मागणी करीत सोमवारी शिष्टमंडळाने नांदेडचे पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांची भेट घेऊन निवेदन सादर केले.

गोकुंदा येथील स्व. बाळासाहेब ठाकरे चौक हा परिसरातील प्रमुख बाजारपेठेचा आणि वर्दळीचा भाग आहे. या परिसरात शाळा, महाविद्यालये, खासगी शिक्षण संस्था, पोलीस प्रशिक्षण केंद्र, उपजिल्हा रुग्णालय आणि आदिवासी प्रकल्प कार्यालय असल्याने विद्यार्थी, महिला, रुग्णांसह नागरिकांची मोठी वर्दळ असते. मात्र, स्वतंत्र ग्रामीण पोलीस ठाण्याअभावी परिसरातील नागरिकांना सुरक्षिततेबाबत चिंता सतावत आहे. दरम्यान, २२ व २३ ऑक्टोबर रोजी ठाकरे चौकात दोन गटांत धारदार शस्त्रांनी झालेल्या तुंबळ हाणामारीत अनेक जण गंभीर जखमी झाले होते. या गँगवारमुळे गोकुंदा परिसरासह किनवतमध्ये दहशतीचे वातावरण निर्माण झाले असून व्यापारी आणि व्यावसायिकांमध्येही भीती पसरली आहे. या पार्श्वभूमीवर गुन्हेगारीवर नियंत्रण मिळविण्यासाठी गोकुंदा येथे स्वतंत्र ग्रामीण पोलीस ठाणे तातडीने मंजूर करून कार्यान्वित करण्याची मागणी करण्यात आली.परिसरातील वाढत्या गुन्हेगारीला आळा घालण्यात पोलीस प्रशासन अपयशी ठरत असल्याचा आरोप करीत पोलीस निरीक्षक जगदीश मंडलवार यांची तातडीने बदली करावी, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे. तसेच किनवट पोलीस ठाण्यात सक्षम अधिकाऱ्याची नियुक्ती करून रिक्त पदे तातडीने भरावीत, अशीही मागणी करण्यात आली. अवैध मटका, जुगार, गुटखा विक्री, अवैध दारू वाहतूक व विक्री तसेच गांजासारख्या अमली पदार्थांच्या अवैध व्यवहारांविरोधात विशेष मोहीम राबवावी. सराईत गुन्हेगारांवर प्रतिबंधात्मक कारवाई करून ठाकरे चौकातील हाणामारी प्रकरणातील दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणीही शिष्टमंडळाने केली. या शिष्टमंडळात माजी नगराध्यक्ष इसाखान, व्यंकटराव नेम्मानीवार, व्यंकटअण्णा भंडारवार, मारुती सुंकलवाड, संदीप निखाते, आशिष देशपांडे यांच्यासह अन्य नागरिकांचा सहभाग होता.



प्रा.डॉ.किरण शिल्लेवार व डॉ.दिप्ती तोटावर यांच्या ''मत्स्यपालन'' या पुस्तकाचे प्रकाशन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते संपन्न झाले. यावेळी आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर, आ.हेमंत पाटील, आ.बालाजी कल्याणकर आदी उपस्थित होते.

रेल्वेच्या तिकीट तपासणी मोहिमेत ४.८७ लाखांचा दंड वसूल



नांदेड/प्रतिनिधी-रेल्वे विभागाने सोमवार दि.२ नोव्हेंबर रोजी राबविलेल्या विशेष तिकीट तपासणी मोहिमेत प्रवाशांकडून ४ लाख ८७ हजार रुपयांचा दंड वसुल करण्यात आला आहे.

दक्षिण मध्य रेल्वे विभागाचे सहाय्यक वाणिज्य व्यवस्थापक शैलेषकुमार यांच्या मार्गदर्शनाखाली सोमवारी विशेष तिकीट तपासणी मोहिम राबविण्यात आली. या तपासणी मोहिमेत ३३ तिकीट तपासणी कर्मचारी तसेच आरपीएफचे कर्मचारी सहभागी झाले होते. या कर्मचाऱ्यांनी २६ गाड्यांमधील प्रवाशांची तपासणी केली. या मोहिमे दरम्यान विना तिकीट आणि अनियमित प्रवाशांची एकूण ७२८ प्रकरणे आढळून आली. या प्रवाशांकडून रेल्वे विभागाने ४ लाख ८७ हजार रुपयांचा दंड वसूल केला आहे.

बहिणीकडे जातो सांगून घराबाहेर पडलेले वडील बेपत्ता

देगलूर/प्रतिनिधी- नरंगल येथील गंगाराम उर्फ अमृतवार यांनी बहिणीकडे बोधन येथे जात असल्याचे सांगून घरातून बाहेर पडलेले साठ वर्षीय वडील अद्याप घरी परतलेच नाहीत. कुटुंबीयांनी नातेवाईकासह सर्वत्र शोधाशोध केली. मात्र त्यांचा कुठेही ठाव ठिकाणा लागला नाही. त्यामुळे कुटुंबीयांची चिंता त्यांना अज्ञात कारणासाठी गुप्तपणे अटकवून ठेवण्याच्या उद्देशाने पळून नेल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे.

देगलूर तालुक्यातील लचमना मलापुरे (वय ६०) हे दि.२० ऑक्टोंबर रोजी सकाळी बारा वाजण्याच्या सुमारास बोधन येथे बहिणीकडे जात असल्याचे सांगून घराबाहेर पडले. मात्र, बराच वेळ उलटूनही ते घरी परतले नाहीत. सुरुवातीला ते नातेवाईकाकडे असतील, अशी कुटुंबीयांना आशा होती. परंतु दिवस सरत गेले तरी त्यांचा काहीच पत्ता लागला नाही. त्यांचे पुत्र शंकर मल्लापुरे वडिलांचा नातेवाईकांकडे तसेच संभाव्य ठिकाणी शोध घेतला. मात्र, वडील सापडले नाहीत. अखेर त्यांनी दिलेल्या तक्रारीवरून देगलूर ठाण्यात विविध कलमान्वये अज्ञात आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्रशिक्षणार्थी पोलीस उपाधीक्षक वैभव पडवळ यांच्या आदेशाने पुढील तपास जमादार नामदेव वानरे करीत आहेत.

प्रभाग ९ व १० मधील पात्र अतिक्रमित घरांना भोगवटादार वर्ग-२ चा हक्क द्या!

नगरसेविका प्रियंका कांबळे यांची शासनाकडे निवेदनांद्वारे मागणी



नांदेड/प्रतिनिधी-नांदेड-वाघाळा शहर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग क्रमांक ९ आणि प्रभाग क्रमांक १० (अ) दत्तनगर येथील पात्र निवासी अतिक्रमणे नियमानुकूल करून नागरिकांना भोगवटादार वर्ग-२ चा हक्क द्यावा, अशी मागणी नगरसेविका सौ. प्रियंका संघरत्न कांबळे यांनी दोन स्वतंत्र निवेदनांद्वारे केली आहे. यासंदर्भात त्यांनी महानगरपालिका आयुक्त तसेच खा. अशोकराव चव्हाण यांच्याकडे निवेदन सादर केले आहे.

प्रभाग क्रमांक ९ मधील खोब्रागडे नगर क्रमांक १ व २, ईश्वरनगर आणि मगनपुरा परिसरात सुमारे ५० वर्षांपासून वास्तव्यास असलेल्या नागरिकांच्या घरांचा प्रश्न मार्गी लावावा, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे. तसेच प्रभाग क्रमांक १० (अ) दत्तनगर संदर्भातही स्वतंत्र निवेदन देऊन पात्र नागरिकांना शासनाच्या नियमानुसार दिलासा देण्याची मागणी करण्यात आली आहे.महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वन विभागाच्या २५ मार्च २०२६ रोजीच्या शासन निर्णयानुसार पात्र निवासी अतिक्रमणे नियमानुकूल करण्याची प्रक्रिया राबवावी. संबंधित नागरिकांचे अर्ज स्वीकारून जागांची मोजणी व कागदपत्रांची छाननी करावी आणि पात्र प्रस्तावांवर तातडीने कार्यवाही करावी, अशी मागणी कांबळे यांनी केली आहे.शासन निर्णयानुसार ३१ डिसेंबर २०२६ पर्यंतची मुदत लक्षात घेऊन प्रशासनाने विलंब न करता कार्यवाही करावी आणि अनेक वर्षांपासून वास्तव्यास असलेल्या पात्र कुटुंबांना दिलासा द्यावा, असेही त्यांनी निवेदनात नमूद केले आहे.

दुष्काळी परिस्थितीत मजुरांचे स्थलांतर रोखण्यासाठी रोजगार हमीच्या कामांना गती

नांदेड/प्रतिनिधी-जिल्ह्यात एल निनोच्या प्रभावामुळे निर्माण झालेली दुष्काळसदृश परिस्थिती, रब्बी हंगामातील कमी पेरणी आणि शेतीतील रोजगाराच्या मर्यादित संधी लक्षात घेता ग्रामीण भागातील शेतकरी व शेतमजुरांचे रोजगारासाठी होणारे स्थलांतर रोखण्यासाठी जिल्हा प्रशासनाने विशेष उपाययोजना हाती घेतल्या आहेत. ग्रामीण भागातील मजुरांना त्यांच्या गावातच रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी महाराष्ट्र रोजगार हमी योजना तसेच विकसित भारत-रोजगार व आजीविका हमी अभियान (ग्रामीण) प्रभावीपणे राबविण्याचे निर्देश जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी संबंधित यंत्रणांना दिले आहेत.

या अनुषंगाने जिल्ह्यातील सर्व तहसीलदार, गटविकास अधिकारी तसेच कृषी, सामाजिक वनीकरण, वन विभाग आणि जलसंधारण विभागाच्या प्रमुखांना अर्धशासकीय पत्राद्वारे विविध उपाययोजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. त्यानुसार प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये दर १५ दिवसांनी रोजगार मागणी शिबिर आयोजित करून मजुरांच्या कामाच्या मागणीची नोंद करण्यात येणार आहे. तसेच प्रत्येक तालुक्यात आठवडी बाजाराच्या दिवशी तालुकास्तरीय रोजगार मागणी शिबिर आयोजित करून महिन्यात किमान दोन शिबिरे घेण्यात येणार आहेत. प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये किमान १०० मजुरांना रोजगार उपलब्ध करून देता येईल, एवढ्या मनुष्यदिनांच्या कामांचा कृती आराखडा तयार करून कामे उपलब्ध ठेवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. तसेच प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये किमान १०० जलतारा कामे हाती घेण्यासह पुनर्भरण न झालेल्या वैयक्तिक विहिरींच्या पुनर्भरणाची कामे प्राधान्याने करण्यास सांगण्यात आले आहे. या माध्यमातून रोजगारनिर्मितीसोबतच जलसंधारण आणि भूजल पातळी वाढविण्यावर भर देण्यात येणार आहे.

पात्र लाभार्थ्यांनी रेशन कार्ड पुन्हा सुरु करावे

तहसीलदार रामेश्वर गोरे यांचे आवाहन

कंधार/प्रतिनिधी-महाराष्ट्र शासनाच्या 'मिशन सुधार अभियान' अंतर्गत कंधार तालुक्यातील प्राधान्य कुटुंब धारक सुमारे ६ हजार लाभार्थ्यांची रेशन कार्ड्स विविध कारणांमुळे तात्पुरती स्थगित करण्यात आली आहेत. या बंद झालेल्या रेशन कार्डधारकांपैकी जे नागरिक खरोखरच पात्र आणि खरे लाभार्थी आहेत, त्यांनी तातडीने आवश्यक कागदपत्रांसह थेट पुरवठा विभागाकडे अर्ज सादर करून आपला लाभ पुन्हा सुरू करून घ्यावा, असे आवाहन तहसीलदार रामेश्वर गोरे यांनी केले आहे.

शासनातर्फे सार्वजनिक वितरण प्रणाली अधिक पारदर्शक व्हावी आणि रेशनचा लाभ केवळ खऱ्या व पात्र गरिबांपर्यंतच पोहोचावा, यासाठी हे 'मिशन सुधार अभियान' राबवले जात आहे. या मोहिमेअंतर्गत रेशन कार्ड धारकांच्या कागदपत्रांची कसून पडताळणी करण्यात आली. ज्या लाभार्थ्यांच्या कागदपत्रांची पूर्तता झालेली नाही किंवा पडताळणी प्रलंबित आहे, अशी रेशन काड्र्स प्रशासनाकडून तात्पुरती बंद करण्यात आली आहेत. ज्या लाभार्थ्यांचे रेशन कार्ड बंद झाले आहे, त्यांनी कोणत्याही मध्यस्थावर अवलंबून न राहता स्वतः किंवा आपल्या कुटुंबातील सदस्यामार्फत थेट तहसील कार्यालयातील पुरवठा विभागाशी संपर्क साधावा आणि रीतसर अर्ज सादर करावा, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. अर्जासोबत कुटुंबातील सर्व सदस्यांचे आधार कार्ड, जुने रेशन कार्ड किंवा रेशन पावती, उत्पन्नाचा दाखला, पात्रता सिद्ध करणारी इतर आवश्यक कागदपत्रे जोडावेत.शासनाच्या धान्य योजनेचा लाभ अखंडितपणे सुरू ठेवण्यासाठी पात्र नागरिकांनी लवकरात लवकर कागदपत्रांची पूर्तता करून आपली रेशन काड्र्स पूर्ववत सुरू करून घ्यावीत. कोणत्याही अफवांवर विश्वास न ठेवता थेट शासकीय यंत्रणेशी संपर्क साधावा, असे सांगण्यात आले आहे.

स्वारातीम विद्यापीठाला आयडीबीआय बँकेकडून २५ लाखांचा सीएसआर निधी

नांदेड/प्रतिनिधी-स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाला आयडीबीआय बँकेच्या कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी निधीतून २५ लाख रुपयांचा निधी प्राप्त झाला आहे. विद्यापीठाच्या विकासाच्या दृष्टीने ही महत्त्वपूर्ण आणि अभिमानास्पद उपलब्धी असून, विद्यापीठाच्या इतिहासात या यशाची विशेष नोंद घेतली जाणार आहे.

कुलगुरू डॉ. मनोहर जी. चासकर यांच्या दूरदृष्टीपूर्ण नियोजनामुळे, विकासाभिमुख दृष्टिकोनामुळे आणि सक्षम नेतृत्वामुळे विद्यापीठाने विकासाच्या दिशेने आणखी एक महत्त्वपूर्ण टप्पा गाठला आहे. विद्यापीठाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी विविध नावीन्यपूर्ण उपक्रम राबविण्यासोबतच विकासासाठी निधीची नवनवीन साधने उपलब्ध करून देण्यावर भर दिला जात आहे. या यशामध्ये विद्यापीठाचे वित्त व लेखा अधिकारी डॉ. राजेश शिंदे यांचे विशेष योगदान आहे. त्यांचा सातत्यपूर्ण पाठपुरावा, नियोजनबद्ध प्रयत्न, चिकाटी आणि सकारात्मक दृष्टिकोन यामुळे हा महत्त्वपूर्ण सीएसआर निधी विद्यापीठाला मिळविण्यात यश आले. त्यांच्या या उल्लेखनीय प्रयत्नांचे विद्यापीठ स्तरावर कौतुक होत आहे.

जुगार अड्डयावर पोलीसांची धाड

नांदेड/प्रतिनिधी-उमरी तालुक्यातील अब्दुल्हापूरवाडी शिवारात सुरु असलेल्या जुगार अड्डयावर रविवारी सायंकाळी पोलीसांनी धाड टाकुन सात जणांना अटक केली आहे.

अब्दुल्हापूरवाडी शिवारातील एका शेतात जुगार अड्डा सुरु असल्याची माहिती उमरी पोलीसांना मिळाली. रविवारी सायंकाळी पोलीसांच्या एका पथकाने जुगार अड्डयावर छापा टाकला. झन्नामन्ना नावाचा जुगार खेळत असतांना जगदीश दयाराम चव्हाण (वय ३७) रा.व्यंकटेशनगर,उमरी, राहुल बालाजी कांबळे (वय २८) रा.गोरठा, दिगांबर रामराव पवार (वय ३८) रा.हातणी, साई व्यंकटी खांडरे, कृष्णा व्यंकटी खांडरे, नागन गोमासे रा.गोरठा, विक्रम रनवीरे रा.मच्छीमार्केट, उमरी या सात जणांना रंगेहाथ पकडले. त्यांच्या जवळून जुगाराचे साहित्य, रोख रक्कम असा ४० हजार रुपयांचा ऐवज पोलीसांनी जप्त केला.

ग्रामीण भागातील शिक्षणासाठी रोटरी क्लबचा पुढाकार-प्रा.डॉ.अनिल काळबांडे

उमरखेड/प्रतिनिधी-जगभरातील शोषित, वंचित घटकांसाठी सामाजिक कार्य करणारी रोटरी क्लब आता ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी आणि सर्वांगीण विकासासाठी सक्रियपणे कार्य करीत आहे, असे प्रतिपादन या प्रकल्पाचे संयोजक प्रा. डॉ. अनिल काळबांडे यांनी केले.

मुळावा येथील सदधम्म विद्यालय आणि सम्यक दृष्टी विद्यालयातील इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित मोफत शैक्षणिक ॲप वितरण सोहळ्यात ते मार्गदर्शक म्हणून बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मिलिंद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विश्वास दामोधर होते. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांना शिक्षणाचे महत्त्व पटवून देत या ॲपचा जास्तीत जास्त वापर करून गुणवत्तापूर्ण यश संपादन करण्याचे आवाहन केले. कार्यक्रमात प्रमुख अतिथी म्हणून मुख्याध्यापक संतोष हरणे, मुख्याध्यापक मिलिंद हरणे, सुमेध कांबळे, विक्की खडसे, शिवानंद सुरोशे, संभाजी गायकवाड, उत्तम पाईकराव यांच्यासह दोन्ही शाळांमधील शिक्षकवृंद मोठ्या संख्येने उपस्थित होता. यावेळी सदधम्म विद्यालय व सम्यक दृष्टी विद्यालयातील दहावीच्या सर्व विद्यार्थ्यांना मोफत शैक्षणिक ॲपचे वाटप करण्यात आले. या ॲपमुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना स्पर्धात्मक युगात दर्जेदार शिक्षण मिळण्यास मदत होणार आहे.

माहूर तालुक्यातही विद्यार्थ्यांची खरेदी-विक्री होतेय का?

बीडमधील प्रकारानंतर संशयाला बळ;स्टुडंट पोर्टलवरील पटसंख्येची सखोल पडताळणी करण्याची मागणी



माहूर/प्रतिनिधी-माहूर तालुक्यात २१ प्राथमिक व माध्यमिक अनुदानित शाळा आहेत. त्यातच इंग्रजी माध्यमाच्या शाळांची संख्याही मोठ्या प्रमाणात वाढली आहे. मात्र, शिक्षणासारख्या पवित्र क्षेत्राला काही कथित संस्थाचालकांनी व्यवसायाचे स्वरूप दिल्याचा संशय व्यक्त होत आहे. नुकताच बीड जिल्ह्यात उघडकीस आलेला विद्यार्थ्यांच्या कथित खरेदी-विक्रीचा प्रकार पाहता माहूर तालुक्यातील शाळांच्या विद्यार्थी पटसंख्येचीही तपासणी करण्याची मागणी पुढे आली आहे.

शाळेची पटसंख्या वाढवून दाखवायची, त्याआधारे शिक्षक भरती करायची, भरतीसाठी शिक्षकांकडून २५ ते ३५ लाख रुपये उकळायचे आणि प्रत्यक्षात विद्यार्थी संख्या कमी असल्यास इतर ठिकाणच्या विद्यार्थ्यांची नावे शाळेच्या हजेरी पटावर दाखवायची, असा प्रकार बीड जिल्ह्यातील चंपावती शाळेवरील कारवाईतून समोर आल्याचे वृत्त आहे. शिक्षकांची पदे अतिरिक्त ठरू नयेत, यासाठी चक्क उत्तराखंडमधील विद्यार्थ्यांची नोंद शाळेच्या पटावर करण्यात आल्याचेही उघड झाले आहे. या प्रकरणामुळे शिक्षण क्षेत्रातील पटसंख्येच्या गैरव्यवहाराचा मुद्दा ऐरणीवर आला आहे. बीडमधील या प्रकारानंतर माहूर तालुक्यातील काही शाळांमध्येही अशाच पद्धतीने विद्यार्थ्यांची बोगस नोंदणी किंवा विद्यार्थ्यांच्या आयडीचा गैरवापर होत नाही ना, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. काही ठिकाणी प्रत्यक्ष विद्यार्थी संख्या कमी असतानाही दुसऱ्या शाळेतील विद्यार्थ्यांच्या आयडीचा वापर करून शिक्षकांची अतिरिक्त ठरणारी पदे वाचवली जात असल्याच्या तक्रारी चर्चेत आहेत. विशेष म्हणजे, शिक्षक भरतीसाठी काही शिक्षकांनी संस्थाचालकांना लाखो रुपये दिल्याचीही चर्चा आहे. मात्र, या बाबींची अधिकृत चौकशी होणे आवश्यक आहे.

माहूर तालुक्यातील शाळांच्या प्रत्यक्ष विद्यार्थी संख्येची आणि स्टुडंट पोर्टलवरील नोंदींची पडताळणी केल्यास वस्तुस्थिती समोर येऊ शकते. त्यामुळे नांदेड जिल्हा परिषद शिक्षण विभागाने याकडे गांभीर्याने लक्ष देऊन तालुक्यातील सर्व अनुदानित शाळांची विशेष तपासणी मोहीम राबवावी, अशी मागणी होत आहे. स्टुडंट पोर्टलवरील विद्यार्थ्यांची नावे, आधार व विद्यार्थी आयडी, प्रत्यक्ष उपस्थिती, शाळेतील उपलब्ध विद्यार्थी आणि मंजूर शिक्षक पदे यांची परस्पर पडताळणी करावी. केवळ कागदोपत्री पटसंख्या दाखवून शासनाच्या अनुदानाचा किंवा शिक्षक पदांचा लाभ घेतला जात आहे का, याचीही चौकशी व्हावी. बीडसारखा प्रकार घडण्याची वाट न पाहता शिक्षण विभागाने वेळीच तपासणी करून सत्य परिस्थिती जनतेसमोर आणावी, अशी मागणी पालक व शिक्षणप्रेमी नागरिकांकडून होत आहे.

जुगार अड्डयावर पोलीसांची धाड

नांदेड/प्रतिनिधी-नांदेड शहरातील दिलीपसिंग कॉलनी भागात सुरु असलेल्या जुगार अड्डयावर रविवारी रात्री पोलीसांनी धाड टाकुन जुगार खेळणाऱ्या दहा जणांना अटक केली.

दिलीपसिंग कॉलनी भागात राहुल माने (वय २५) व इतर नऊ जण हे पैसे लावून तिर्रट नावाचा जुगार खेळत असतांना वजिराबाद पोलीसांनी रविवारी रात्री रंगेहाथ पकडले. त्यांच्या जवळून रोख सात हजार रुपये व जुगाराचे साहित्य पोलीसांनी जप्त केले आहेत. याप्रकरणी दहा जणांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मांडवी ते बोथ फाटा जंगलात गोवंश तस्करीचा पर्दाफाश;३ लाख ४० हजारांचा मुद्देमाल जप्त

मांडवी/प्रतिनिधी-मांडवी ते बोथ फाटा परिसरातील टिटवी जंगलातून गोवंशाची अवैध वाहतूक करणारी पिकअप वाहन सोमवारी रात्री मांडवी पोलिसांनी पकडले असून याप्रकरणी दोन जणांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

टिटवी जंगलातून गोवंशाची अवैधरित्या वाहतूक होत असल्याची माहिती मांडवी पोलीसांना मिळाली. सहायक पोलीस निरीक्षक गगाधर गायकवाड यांच्या आदेशानुसार, पोलीस उपनिरीक्षक मुरारी गायकवाड व पोलीस कर्मचाऱ्यांनी सोमवारी रात्री मांडवी ते बोथ फाटा मार्गावरील टिटवी जंगलात सापळा रचला. दरम्यान, पाटोदा पाटीजवळ पिकअप क्र.एमएच-२९-बी.ई.-६९९४ अडवून वाहनाची तपासणी केली. वाहनात अत्यंत क्रुर पध्दतीने व दाटीवाटीने डांबुन ठेवलेले नऊ गोवंश पोलीसांना आढळून आले. पोलीसांनी पिकअप वाहन व गोवंश असा ३ लाख ४० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. सदरील गोवंश हे हिवरा जि.यवतमाळ येथुन तेलंगणातील आदिलाबाद जिल्ह्यात कत्तलीसाठी घेवून जात होते. पोलीसांनी वाहन चालक प्रफुल बाबाराव जगताप (वय २९) रा. शिरोली, ता. घाटंजी, अनिस चांद कुरेशी (वय २१) धंदा व्यापार, रा. धानोरा, इंदूरवेली, जि. आदिलाबाद यांना अटक केली असून त्यांच्या विरोधात मांडवी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

प्रशासनाने बाभळी बंधाऱ्यात तात्काळ पाणी सोडावे

उपजिल्हाप्रमुख गणेश गिरी यांनी दिला आंदोलनाचा इशारा



धर्माबाद/प्रतिनिधी-तालुक्यात पावसाने ओढ दिल्यामुळे खरीप हंगाम पूर्णपणे उद्ध्वस्त झाला असून रब्बी हंगामही धोक्यात आला आहे. अशा दुष्काळ परिस्थितीत, प्रशासनाने तात्काळ बाभळी बंधाऱ्यात पाणी सोडले नाही तर तालुक्यातील शेतकरी रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन करतील, असा थेट आणि आक्रमक इशारा शिवसेना (उबाठा) गटाचे जिल्हा उपप्रमुख गणेश गिरी महाराज यांनी पत्रकार परिषदेत दिला आहे.

बाभळी बंधाऱ्याचे दरवाजे चार महिने उघडे राहिल्याने सध्या बंधारा कोरडा ठणठणीत पडला असून, तालुक्यात पाण्याचे तीव्र दुर्भिक्ष निर्माण झाले आहे. अपुऱ्या पावसामुळे खरिपाची पिके हातची गेली आहेत. पाणी नसल्याने रब्बीची पेरणी कशी करायची, हा यक्षप्रश्न शेतकऱ्यांसमोर उभा ठाकला आहे. कालवा क्षेत्रातील आणि नदीकाठच्या गावांमध्ये चारा आणि पाण्याच्या तीव्र टंचाईमुळे पशुधन धोक्यात आले आहे. वेळेत पाणी न मिळाल्यास मोठ्या प्रमाणावर जनावरे खाटकाला किंवा दगावण्याची भीती आहे. तालुक्यातील अनेक गावांच्या पाणीपुरवठा योजना केवळ बाभळी बंधाऱ्याच्या पाण्यावर अवलंबून आहेत. बंधारा कोरडा असल्याने आगामी काळात पाण्यासाठी तीव्र दाहीदिशा होणार आहेत. सरकारच्या ढिसाळ नियोजनामुळे धर्माबाद तालुक्याला त्याच्या हक्काचे पाणी योग्य प्रमाणात मिळाले नाही. जर प्रशासनाने आताच बळेगाव किंवा विष्णूपुरी धरणातून बाभळी बंधाऱ्यात पाणी सोडले, तर भविष्यात टँकरवर होणारा शासनाचा कोट्यवधी रुपयांचा खर्च वाचू शकतो. पाटबंधारे विभाग धर्माबाद तालुक्याबाबत दुजाभाव आणि अन्यायकारक भूमिका घेत असल्याचा आरोप त्यांनी केला. जर प्रशासनाने या मागणीकडे डोळेझाक केली, तर तालुक्यातील सर्वसामान्य आणि संतप्त शेतकऱ्यांना सोबत घेऊन रस्त्यावर उतरून कायदा हातात न घेता तीव्र संघर्ष केला जाईल, ज्यामुळे निर्माण होणाऱ्या परिस्थितीला सर्वस्वी प्रशासन जबाबदार असेल, असा गर्भित इशारा गिरी यांनी दिला आहे.

भोकर एसबीआय बँकेमध्ये दलालांचा सुळसुळाट

शेतकऱ्यांना पिक कर्ज घेण्यासाठी मोजावे लागतात पैसे

भोकर/प्रतिनिधी- येथील स्टेट बँक ऑफ इंडिया शाखेमध्ये शेतकऱ्यांना पीक कर्ज घेण्यासाठी दलालांना पैसे द्यावे लागतात पैसे दिल्याशिवाय फाईल मंजूर होत नाही दलालांचा सुळसुळाट झाल्यामुळे शेतकऱ्यांना आर्थिक भुर्दंड सोसावा लागत आहे.

भोकर येथील एसबीआय बँकेची शाखा सर्वात मोठी राष्ट्रीयकृत बँक असून शेतकरी, महिला बचत गट, कर्मचारी, शासकीय खाते, व्यापारी, निवृत्त कर्मचारी यांचे मोठ्या प्रमाणावर खाती आहेत नेहमी बँकेमध्ये व्यवहारासाठी गर्दी होत असते. बँकेतील अधिकारी कर्मचारी सर्वसामान्य खातेदारांना व्यवस्थित बोलत नाहीत माहिती देत नाहीत अशिक्षित खातेदारांना मोठा त्रास सहन करावा लागतो. वरिष्ठ अधिकाऱ्यांचे नियंत्रण नसल्यामुळे बँकेचा कारभार विस्कळीत झालेला आहे कुठलीच माहिती खातेदारांना योग्य प्रकारे सांगितल्या जात नाही. ज्या शेतकऱ्यांचे कर्ज माफी झालेली आहे त्या शेतकऱ्यांना नवीन पीक कर्ज विनाअट देणे गरजेचे आहे मात्र भोकर एसबीआय बँकेमध्ये पीक कर्ज देण्यासाठी टाळाटाळ केली जाते शेतकऱ्यांना फिरवले जाते वेळेवर फाईल मंजूर केली जात नाही. दलाला मार्फत फाईल ज्यांच्या गेलेल्या आहेत त्यांना पीक कर्ज वेळेवर मिळते २ ते ३ हजार रुपये दलाल घेऊन फाईल बनवत आहेत यामुळे सर्वसामान्य शेतकरी महिला वर्ग अडचणीत आलेला आहे दुष्काळ पसरलेला असताना बँकेकडून आर्थिक मदत व्हावी यासाठी शेतकरी बँकेत चकरा मारीत आहेत मात्र बँकेत वेळेवर कामे होत नसल्याने शेतकरी त्रस्त झाले आहेत. भोकर एसबीआय बँकेत झालेला दलालांचा सुळसुळाट व सर्वसामान्य खातेदारां ची होणारी लूट थांबविण्यात यावी अशी मागणी होत आहे.

मुख्यमंत्र्यांकडून भाजप पदाधिकाऱ्यांच्या कामाचा आढावा

पुणे:विधान परिषद निवडणुकीतील निकालाने भारतीय जनता पक्षाच्या संघटनात्मक कामकाजातील त्रुटी उघड केल्यानंतर पक्षांतर्गत हालचालींना वेग आला आहे. पुण्यासह पश्चिम महाराष्ट्रातील पक्ष संघटनेत मोठे फेरबदल होण्याचे संकेत मिळत असून, निष्क्रिय पदाधिकाऱ्यांची जबाबदारी बदलून नव्या चेहऱ्यांना संधी देण्याची तयारी सुरू असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे संघटनेच्या कामकाजावर नाराज असल्याचे बोलले जात असून, पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीतील कामगिरीचा सविस्तर आढावा घेतला जाण्याची शक्यता आहे. मतदार नोंदणीपासून प्रचारापर्यंत पदाधिकाऱ्यांनी पार पाडलेल्या जबाबदाऱ्यांची तपासणी होणार असून, अपेक्षित कामगिरी न करणाऱ्यांच्या पदांबाबत निर्णय घेतला जाऊ शकतो. पश्चिम महाराष्ट्रात भाजपचे २९ आमदार आणि तीन खासदार असून, चार मंत्रीही या भागातील आहेत. एवढे राजकीय बळ असतानाही पदवीधर मतदारसंघात पक्षाला पराभवाचा सामना करावा लागला. शिक्षक मतदारसंघात विजय मिळाला असला, तरी संघटनात्मक पातळीवर अपेक्षित काम झाले नसल्याचे पक्षनेतृत्वाचे निरीक्षण असल्याचे समजते. विशेषतः पुणे आणि पिंपरी-चिंचवडमध्ये मजबूत संघटनात्मक ताकद असूनही मतदार नोंदणीचे उद्दिष्ट पूर्ण करता आले नाही. त्यामुळे स्थानिक पदाधिकारी आणि लोकप्रतिनिधींच्या कामगिरीची तपासणी होण्याची शक्यता आहे. दरम्यान, विधान परिषद निवडणुकीतील कामगिरीची केंद्रीय नेतृत्वानेही दखल घेतल्याची चर्चा आहे. पराभवाची कारणे आणि संघटनात्मक त्रुटी याबाबत प्रदेशाध्यक्षांकडून अहवाल मागविण्याचे संकेत आहेत. त्यामुळे राज्यातील संघटनात्मक रचनेत बदल करताना पश्चिम महाराष्ट्राला विशेष महत्त्व दिले जाण्याची शक्यता आहे.पक्ष संघटनेबरोबरच राज्य मंत्रिमंडळातील संभाव्य फेरबदलांचीही चर्चा सुरू आहे. मंत्रिमंडळात बदल झाल्यास नव्याने निवडून आलेल्या आमदारांना संधी मिळू शकते. मात्र, याबाबत अद्याप अधिकृत घोषणा झालेली नाही.पुणे महापालिकेतील विषय समित्यांच्या रचनेतही पुढील वर्षी जानेवारी-फेब्रुवारी दरम्यान बदल होण्याची शक्यता आहे.

दिया मिर्झा देशाच्या मोठ्या नेत्या नाहीत-मुख्यमंत्री

मुंबई/प्रतिनिधी- बॉलिवूड अभिनेत्री दिया मिर्झाच्या दिवाळी शुभेच्छा व्हिडीओवरून निर्माण झालेल्या वादात मुंबई उच्च न्यायालयाने भाजप नेत्यांवर केलेल्या टिप्पणीची राजकीय वर्तुळात चर्चा सुरू आहे. या प्रकरणावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रतिक्रिया देत न्यायालयाने भाजप नेत्यांना फटकारल्याचे आपल्याला वाटत नसल्याचे स्पष्ट केले. तसेच, हा प्रश्न आपल्या पातळीवरील नसल्याचे सांगत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, ''मला वाटत नाही की न्यायालयाने असे फटकारले असेल. मुळात हे प्रकरण न्यायालयात गेलेच नाही. व्हिडीओ डिलिट केला आहे, ही मुंबई महापालिकेची मर्जी आहे. मुंबई महापालिकेने जे ठरवले आणि त्यांना जे योग्य वाटले, ते त्यांनी केले. मुळात दिया मिर्झा काय देशाच्या मोठ्या नेत्या नाहीत. हा प्रश्न इतका छोटा आहे की, आमच्या पातळीवरील प्रश्न नाही,'' असे फडणवीस यांनी स्पष्ट केले.



भोई समाज महासंघ नांदेडच्यावतीने भोई समाजाच्या विविध मागण्यांसाठी राजू मामीडवार यांच्या नेतृत्वात जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात मोठ्या संख्येने भोई समाजबांधव सहभागी झाले होते.

पान १ वरुन

दिवाळीच्या तोंडावर...

ठिकाणी विजांच्या कडकडाटासह मेघगर्जना होण्याचा अंदाज असल्याने नागरिकांनी खबरदारी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. मराठवाड्यातील बहुतांश जिल्ह्यांत पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे. विशेषतः नांदेड आणि लातूर जिल्ह्यांना पावसाचा येलो अलर्ट जारी करण्यात आला असून, पुढील तीन दिवस पावसाच्या सरी कोसळण्याचा अंदाज आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी काढणीला आलेली पिके, शेतीमाल आणि काढणीनंतरचे उत्पादन सुरक्षित ठिकाणी ठेवण्याची दक्षता घेणे आवश्यक आहे.

जगदंबा तांड्यात रस्त्याअभावी...

करण्याची वेळ वारंवार येते. दुसरीकडे जगदंबा तांड्यासारख्या वस्त्यांना साधा पक्का रस्ता मिळत नसेल, तर आपत्कालीन आरोग्य सेवा कशी पोहोचणार? रुग्णवाहिका पोहोचू शकत नाही, रुग्णांना खांद्यावर किंवा दुचाकीवरून न्यावे लागते आणि उपचारांपूर्वीच जीव जातो, हे कोणत्या विकासाचे लक्षण आहे? दोन्ही घटनांमागील वास्तव एकच आहे. प्रशासनाचे दुर्लक्ष आणि दुर्गम भागातील जनतेच्या मूलभूत सुविधांबाबतची उदासीनता! एका ठिकाणी रस्त्याअभावी उपचार मिळण्यापूर्वी मृत्यू ओढवतो, तर दुसरीकडे रुग्णालयात दाखल होऊनही जीव वाचविण्याची पुरेशी व्यवस्था नसल्याचे चित्र आहे. आदिवासींच्या विकासासाठी निधी खर्च करण्याच्या घोषणा करायच्या आणि प्रत्यक्षात त्यांनाच रस्ते व आरोग्य सुविधांपासून वंचित ठेवायचे, हा विरोधाभास थांबायला हवा. प्रश्न दोन मृत्यूंचा नाही, तर उद्या अशाच परिस्थितीत आणखी किती निष्पाप जीव जाणार, याचा आहे. धुरपतबाई आणि पायल यांच्या मृत्यूने प्रशासनाला जागे करण्यासाठी पुरेसा इशारा दिला आहे. आता तरी कागदी घोडे नाचविण्याऐवजी प्रत्यक्ष काम सुरू होणार का? की आणखी एखाद्या मृत्यूनंतरच प्रशासनाला जाग येणार? दुर्गम भागातील जनतेला विकासाच्या आश्वासनांपेक्षा जगण्याचा मूलभूत अधिकार हवा आहे. तो देणे ही शासनाची जबाबदारी आहे.

ग्रामीण विद्यार्थ्यांना विद्यापीठाची अनोखी सफर;कुलगुरुंशी साधला थेट संवाद

नांदेड/प्रतिनिधी-ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण संस्था, विद्यापीठाचे कामकाज आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या कार्यपद्धतीची प्रत्यक्ष माहिती व्हावी, या उद्देशाने जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, सायाळ (ता. नांदेड) येथील ७० विद्यार्थ्यांनी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाला सदिच्छा भेट दिली. या भेटी दरम्यान विद्यार्थ्यांना विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर आणि प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन यांच्याशी संवाद साधण्याची अनोखी संधी मिळाली.

विशेष म्हणजे, कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांचा नुकताच झालेला वाढदिवस विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी कुलगुरूंनी विद्यार्थ्यांसाठी विशेष वेळ देत प्रत्येक विद्यार्थ्याचे नाव विचारून त्यांच्याशी आपुलकीने संवाद साधला. विद्यार्थ्यांनी विचारलेल्या विविध प्रश्नांना त्यांनी समर्पक उत्तरे दिली. विद्यार्थ्यांसोबत छायाचित्रे काढून त्यांनी त्यांच्या आनंदात सहभाग घेतला. विद्यापीठ प्रशासनाच्या वतीने विद्यार्थ्यांसाठी आवश्यक सुविधांचीही व्यवस्था करण्यात आली होती. त्यानंतर विद्यार्थ्यांनी प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन यांची भेट घेतली. कुलगुरूंची केबिन पाहणे, त्यांच्याशी मनमोकळा संवाद साधणे आणि विद्यापीठातील वरिष्ठ पदाधिकाऱ्यांना प्रत्यक्ष भेटणे, हा ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी निश्चितच प्रेरणादायी अनुभव ठरला.या शैक्षणिक भेटीच्या यशस्वितेसाठी शाळेचे मुख्याध्यापक माणिक भोसले यांच्यासह शिक्षक केंद्रे, कांबळे, शिक्षिका दुथडे, पत्की, गजभारे आणि तुमलवाड यांनी विशेष परिश्रम घेतले.विद्यापीठाची ही भेट विद्यार्थ्यांच्या मनात उच्च शिक्षणाची प्रेरणा निर्माण करणारी आणि त्यांच्या ज्ञानविश्वाचा विस्तार करणारी ठरली.

जिल्हाधिकारी कार्यालयात १७ रोजी पेन्शन अदालत

नांदेड/प्रतिनिधी-महसूल विभागातून सेवानिवृत्त झालेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या पेन्शनविषयक तसेच अन्य प्रशासकीय अडचणींचे निराकरण करण्यासाठी मंगळवार, दि. १७ नोव्हेंबर रोजी जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड येथे पेन्शन अदालत आयोजित करण्यात आली आहे.

या पेन्शन अदालतीमध्ये संबंधित सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या पेन्शनसंदर्भातील तक्रारी व अडचणी जाणून घेऊन त्यांचे निराकरण करण्यासाठी कार्यवाही करण्यात येणार आहे. यासाठी संबंधितांनी १७ नोव्हेंबर रोजी सकाळी ११ ते दुपारी १.३० या वेळेत जिल्हाधिकारी कार्यालयात उपस्थित राहून आपल्या तक्रारींचे निवेदन सादर करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी, नांदेड यांनी केले आहे.

हे वृत्तपत्र प्रकाशक, मालक व संपादक प्रदिप अनंतराव नागापूरकर यांनी मुद्रक अब्दुल गफुर अब्दुल रझाक यांच्या सिमा प्रिंटींग ॲण्ड लिथो प्रिंटींग प्रेस इतवारा बाजार नांदेड, ता.जि.नांदेड येथे छापून नागापूरकर हाऊस, हाऊस नं.१-१०-६९३, विनायकनगर, नवा मोंढा, ता.जि.नांदेड-२ येथे प्रकाशीत केले.आर. एन. आय. नं. ४७१३५/८८ E-mail: nandedwarta@mail.com, मो.९४२२१७४७७४